Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-3 | Sept-2014
Available online at www.aygrt.isrj.org

ब्रिटीश राजवट व महाराष्ट्रातील मजूर चळवळ

डॉ.तुकाराम नारायण शिंदे

इतिहास विभाग , अे.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविदयालय ,सोलापूर.

प्रस्तावना :–

ब्रिटीश राजवटीमध्ये ज्या-ज्या चळवळीचा उदय झाला होता.त्यापैकी मजूर चळवळीचा आवर्जून उल्लेख केला जातो. या काळात मुंबई हे मजूर चळवळीचे केंद्र बनले होते. ब्रिटीशांच्या आगमनानंतर भारतात कारखानदारीला प्रारंभ झाला होता. या कारखान्यातून मजुरी करणारा मजुरांचा वर्ग उदयास आला होता. कारखनदाराकडून मजूराचे प्रचंड शोषण जात होते. ज्याकाळात शेतकरी वर्ग व महिला वर्ग चळवळ करीत होता. त्याचदरम्यान मजूर वर्गातही आपले होणारे शोषण थांबविण्यासाठी व न्याय हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करु लागला होता. रशियामध्ये इ.स. १९१७ मध्ये साम्यवादी क्रांती घडून आल्यानंतर भारतात मजूर चळवळीला अधिक गती प्राप्त झाली . या मजूरांच्या चळवळीत महाराष्ट्रातील मजूर ही सहभागी झाले होते.

मजूर चळवळीची पार्श्वभूमी

१९ व्या शतकाच्या उत्तरार्घात भारतात औदयोगिकीकरणाला प्रारंभ झाला होता. महाराष्ट्रमध्येही मुंबई , सोलापूर , भारतात कलकत्ता व मद्रास ही ठिकाणे महत्वाची औदयोगिक केंद्रे बनली होती. येथे मजूरांची संख्या जास्त होती. कारखानदारांनी प्रारंभापासूनच याकाळात नफयावर लक्ष केंद्रीत केले होते . कारखानदार याकाळात कारखान्यात काम करणाऱ्या मजूरांकडे लक्ष देत नव्हते. मजूर वर्गाचे प्रचंड शोषण केले जात होते. मजूरांना मिळणारे अनिश्चित व अपुरे वेतन ,कामाची अनिश्चितता , भांडवलदार वर्गाकडून होणारे शोषण, न पेलणारा कामाचा बोजा,अस्वच्छता,कर्जबाजारीपणा,रोगराई आणि निरक्षरता इ.मुळे मजूर वर्गाची स्थिती अतिशय दयनीय झाली होती. मजूर वर्गाने साधारणपणे इ.स. १८७५ पासून कारखानदाराकडून होणारे शोषण याविरोधी असंतोष व्यक्त करण्यास प्रारंभ केला होता. महाराष्ट्रातील मजूर वर्ग ठिकठिकाणी संप घडवून आणू लागला होता. इ.स. १८८४ मध्ये मुंबईत गिरणी कामगारांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. वृत्तपत्र संपादक नारायण मेघाजी लोखंडे यांनी या जाहीरसभेचे आयोजन केले होते.[१] कामगारांच्या कामाचे तास कमी करणे, आठवडयातून एक दिवस सुट्टी असावी , जेवणाची सुट्टी असावी आणि कामगारांना कारखान्यातील अपघाताची नुकसान भरपाई मिळावी .इ. मागण्या मुंबई गिरणी कामगारातर्फे फॅक्टरीज कमिशनला सादर करण्यात आल्या होत्या. नारायण मेघाजी लोखंडे यांनी इ.स. १८९० मध्ये कामगार वर्गाच्या हितासाठी 'मुंबई गिरणी कामगार संघ'(Bombay millhands Association) स्थापन केला होता. कामगार वर्गाच्या मागण्या सरकार दरबारी अर्ज ,विनंत्याद्वारे पोहोचविण्याचे कार्य हा संघ करीत होता. मुंबईमधील ही पहिली गिरणी कामगार संघटना होय. पुढे नारायण लोखंडे यांनी 'दीनबंधू' हे वृत्तपत्रही सुरु केले होते. नारायण लोखंडे यांचे हे कार्य कामगारवर्गात जागृतीस प्रारंभ होण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरले. इ.स. १९१० मध्ये मुंबईतील लोकहिताचे कार्य करणाऱ्या लोकांनी 'कामगार हितवर्धक सभा' स्थापन केली होती.[२] मालक व कामगार यांच्यातील तंटे सोडविणे व सरकारकडे कामगार हिताच्या मागण्या करणे या हेतूने या सभेची स्थापना झाली होती. या सर्व स्थितीमुळे महाराष्ट्रात कामगार वर्गात जागृती घडून आली होती. कामगार वर्गातील या जागृतीतूनच पहिल्या महायुध्दानंतर कामगार चळवळ खऱ्या अर्थाने आकारास आली होती.

कामगार चळवळीचा विकास

पहिल्या महायुध्दानंतर महाराष्ट्रासह भारतात कामगार चळवळ उदयास आली होती. पहिल्या महायुध्दानंतरची स्थिती,इ.स. १९१७ ची रशियातील साम्यवादी क्रांती आणि जागतिक साम्यवादी क्रांतीची लाट या पार्श्वभूमीवर भारतातील कामगार वर्ग संघटित होऊ लागला होता. भारतात या स्थितीमुळे आधुनिक कामगार चळवळीला प्रारंभ झाला होता. मानवेंद्रनाथ रॉय भारताबाहेरुन आणि अंबानी मुखर्जी व इतर साम्यवादी विचारांची मंडळी भारतात डावी चळवळ संघटित करीत होते. त्याचदरम्यान महाराष्ट्रामध्ये श्रीपाद अमृत डांगे कामगार वर्गाच्या हितासाठी झटत होते. श्रीपाद डांगे यांनी इ.स. १९२४ मध्ये रणछोडदास लोटावाला यांच्याकडून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे 'सोशॅलिस्ट' हे साप्ताहिक सुरु केले होते.[३] मानवेंद्रनाथ रॉय यांनी ताश्कंद येथे इ.स. १९२० मध्ये 'भारतीय कम्युनिस्ट पक्ष' स्थापन केला होता. तर महाराष्ट्रामध्ये श्रीपाद डांगे यांनी इ.स. १९२३ मध्ये केशवराव जोगळेकर यांच्या मदतीने 'हिन्दुस्थान लेबर सोशॅलिस्ट पार्टी'स्थापन केली होती. याचदरम्यान प्रांतिक काँग्रेसने नेमलेल्या उपसमितीचे सभासद या नात्याने श्रीपाद डांगे केशवराव जोगळेकर ,ल.गो.खरे आणि आर.व्ही. नाडकर्णी हे तरुण मुंबईतील कामगार वस्तीत काम करीत होते. ब्रिटीशांच्या आर्थिक नीतीमुळे भारतातील शेतकऱ्यांच्या कापसाला कमी भाव मिळू लागला यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ लागले. त्याचबरोबर इ.स. १९२७ मध्ये इंग्लंडचे स्वस्त कापड भारतीय बाजारपेठेत आले. स्वदेशी धंदयावर याचा विपरित परिणाम होऊ लागला . भारतातील भांडवलदारांचे नुकसान होऊ लागले. तेव्हा भारतातील भांडवलदारांनी कामगारांचे कामाचे तास वाढविले व पगार कपात केली. तेव्हा श्रीपाद अमृत डांगे केशवराव जोगळेकर आणि निंबकर यांनी गिरणी मालकासमोर कामगार वर्गाची बाजू प्रभावीपणे मांडली तसेच केशवराव जोगळेकर यांनी गिरणी मालकाविरुध्द एकजुटीने लढण्यासाठी गिरणी कामगार महामंडळ व बॉम्बे टेक्सटाईल लेबर युनियन या दोन्ही संघटनांचे एकत्रीकरण घडवून आणण्याचा प्रयत्न केला . यादरम्यान १ मे १९२७ रोजी मुंबई येथे प्रथमच 'कामगार दिन'[४] पाळण्यात आला होता.

महाराष्ट्रात कामगार चळवळीचा विकास होत असताना राष्ट्रीय स्तरावरही कामगारांच्या हितासाठी अनेक संघटना स्थापन होत होत्या. '३१ऑक्टोबर १९२० मध्ये ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस ची स्थापना झाली होती'.[५] या संघटनेचे पहिले अधिवेशन मुंबई येथे भरले होते. लाला लजपतराय अध्यक्षस्थानी होते. १५ मे १९३४ रोजी नरेंद्र देव यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या परिषदेत कॉंग्रेस समाजवादी पक्ष स्थापन झाला होता. याकाळात कामगार वर्गात ऐक्य घडवून आणण्यावर काँग्रेस समाजवादी पक्षाने भर दिला होता. इ.स. १९३८ मध्ये ऑला इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसशी संलग्नित नॅशनल फेडरेशन ऑफ ट्रेड युनियन्स ही संघटना नागपूर येथे स्थापन झाली होती.

यादरम्यान इ.स. १९३३ मध्ये मीरत कट खटल्याचा निकाल लागला होता. या खटल्यातील महाराष्ट्रातील कामगार नेते श्रीपाद डांगे व केशवराव जोगळेकर यांना १२ वर्षे हद्दपारीची शिक्षा ठोठावण्यात आली होती. भारतातील साम्यवादी पक्षाने याकाळात सुरु केलेल्या नॅशनल फ्रंट व क्रांती या मराठी भाषेतील नियकालिकांचा कामगार वर्गाला लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी फार उपयोग झाला होता.

कामगारांचे संप

पहिल्या महायुध्दानंतर कामगार चळवळ सुरु झाली होती. पुढे कामगारांच्या हितासाठी अनेक संघटना स्थापन झाल्या . कामगार वर्गात जागृतीा घडून आली .कामगार वर्गाने याचकाळात आपल्या न्याय मागण्यांची पूर्तता करुन घेण्यासाठी ब्रिटीश सरकार व कारखानदार यांच्याविरुध्द अनके वेळा संप केले. यामध्ये महाराष्ट्रातील कामगारही आघाडीवर होते. महाराष्ट्रातील कामगारांनी अनेक वेळा संप केले. त्यापैकी कांही संपाची माहिती खालीलप्रमाणे -:

१. इ.स. १९१८-२० दरम्यान मुबईतील गिरणी मालकाविरोधी कामगार वर्गात मोठा असंतोष पसरला होता. यामुळे मुबईचे २००००० गिरणी कामगार ,मुंबईच्या डॉक्समधील २०००० मजूर , , टाटा आयर्न ॲन्ड स्टील ४०००० कामगार संपात सहभागी झाले होते. सोलापूरमध्येही याचदरम्यान २६जानेवारी १९२० रोजी कामगारांनी पगारवाढीसाठी कोणत्याही राजकीय पक्षाशिवाय पहिला संप पुकारला होता [६]
२. मुंबईतील कापड गिरणी कामगारांच्या संपामुळे संपूर्ण कापड उदयोगधंदयाला धक्का बसला होता. इ.स. १९२८ मध्ये पगारात वाढ करावी व कामाचे तास कमी करावे अशी मागणी कामगारांनी गिरणी मालकाकडे केली होती. पण गिरणी मालकांनी कामगारांची मागणी फेटाळून लावली तेव्हा मार्च १९२८ मध्ये टेक्स्टाईल मिल आणि कस्तुरचंद मिलमधील कामगार व विणकर संपावर गेले. १८ एप्रिल १९२८ रोजी संप चालविण्यासाठी श्रीपाद डांगे ,निंबकर व मिरजकर यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. नारायण जोशी यांनी संपात सहभागी झालेल्या कामगारांना अन्नधान्य पुरविले . पुढे या संपाचा विस्तार

होत गेला . मुंबईतील ५१ गिरणीमधील कामगार या संपात सहभागी झाले मुंबई प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्षा सरोजिनी नायडू यांनी इ.स. १९२८ च्या संपात सहभागी झालेल्या कामगारांना मदत म्हणून श्रीपाद डांगे यांच्याकडे ६०००/-रुपये दिले . इ.स.१९२८ च्या संपातील कामगारांना रशिया व फ्रान्स या देशातील कामगार संघटनाकडूनही मदत मिळाली होती. श्रीपाद डांगे , नारायण जोशी व मिरजकर यांनी या मदतीतूनच सहा महिन्यात कामगारामध्ये २००००० /- रुपयाचे धान्य वाटले. शेवटी कामगार नेते आणि गिरणी मालक यांच्यात तडजोड झाली गिरणी मालकांनी इ.स. १९२७ पूर्वीचे वेतन कायम ठेवण्याचे मान्य केले. यामुळे ५ ऑक्टोबर १९२८ रोजी हा संप मिटला.

३. इ.स. १९३८ मध्ये इन्डस्ट्रियल डिसप्सूटस बिलाविरोधी मुंबई येथे निषेध संप झाला होता. यामध्ये ९०००० कामगार सहभागी झाले होते.

४. दुसऱ्या महायुध्दाला प्रारंभ झाला तेव्हा कँग्रेस व ब्रिटीश सरकार यांच्यात वाटाघाटी सुरु झाल्या. तेव्हा कामगारांनी ब्रिटीश सरकारला राजकीय विरोध करण्याच्या हेतूने २ आक्टोबर १९३९ मध्ये संप केला होता. मुंबईतील ९०,००० कामगार या संपात सहभागी झाले होते. जागतिक पातळीवरील कामगार चळवळीतील लढाईविरुध्दचा हा कामगारांचा पहिलाच संप होता. या संपाच्या निमित्ताने ब्रिटीश साम्राज्यशक्तीचा सामना करण्यासाठी भारतीय कामगार सज्ज झाला होता.

५. दुसऱ्या महायुध्दादरम्यान बाजरी, ज्वारी, गहू व तांदूळ इ. धान्याच्या किंमती भरमसाठ वाढल्या होत्या. तेव्हा ५ सप्टेंबर १९४० रोजी मुंबईतील कामगारांनी महागाई भत्त्यासाठी संप केला होता. या संपात १७५००० कापड गिरणी कामगार सहभागी झाले होते. पोलिसांनी हा संप दडपून टाकण्यासाठी संप नेत्यांना पकडले. कामगारांना त्यांच्या घरात घुसून दमदाटी करण्यात आली. कामगारांनी तरीही संप चालूच ठेवला .कामगारांचा हा संप ४० दिवस चालू होता. पुढे मुंबईतील या संपाची लाट देशात इतरत्रही पसरली . कानपूर . कलकत्ता ,बंगाल ,बिहार, आसाम व जेमशेदपूर येथेही कामगारांनी संप केला होता.

कामगार चळवळीचे फलित

ब्रिटीश राजवटीमध्ये भारतात जी कामगार चळवळ झाली तिने कामगारांच्या प्रश्नाला वाचा फोडली . कामगारांच्या मागण्या मान्य करुन घेतल्या . ब्रिटीश सरकारनेही कामगारहिताच्या दृष्टीने इ.स. १९३८ मध्ये मुंबई औदयोगिक विवाद कायदा(Bombay industrial Disputes Act मुंबई गुमास्ता कायदा(Bombay shop Assistants १९३९) इ.स. १९३९ मध्ये मध्य प्रदेश प्रसुदी कायदा(Maternity Act) आणि याचवर्षी बंगाल प्रसुती कायदा करण्यात आला होता.[७] इ.स.१९४२ मध्ये चले जाव चळवळीच्या प्रांरभीच ब्रिटीश सरकारने काँग्रेस पक्षाच्या आघाडीच्या नेत्यांना तुरुंगात टाकले होते. काँग्रेस समाजवादी पक्षाने अशावेळी कामगार वर्गाचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला . पण त्यांना यश आले नाही. दुसऱ्या महायुध्दात भारतातील कामगारांनी युरोपमधील हुकूमशहांचा पाडाव घडवून आणण्यासाठी इंग्लंडला मदतच झाली होती. हिन्दु -मुस्लिम व अस्पृश्य वर्गातील कामगार एकत्र आले. त्याचबरोबर दुसऱ्या महायुध्दानंतर भारतीय राजकारणात साम्यवादी पक्षाला तिसऱ्या क्रमांकाचे स्थान प्राप्त झाले होते.

संदर्भ

१. मूळ लेखक -रजनी पाम दत्त ,अनुवाद - य.ना. देवधर ,आजकालचा भारत ,डायमंड पब्लिकेशन्स ,पुणे ,पा. क्र.३९५
२. मूळ लेखक -रजनी पाम दत्त ,अनुवाद - य.ना. देवधर ,आजकालचा भारत ,डायमंड पब्लिकेशन्स ,पुणे ,पा. क्र.३९७
३. मूळ लेखक -रजनी पाम दत्त ,अनुवाद - य.ना. देवधर ,आजकालचा भारत ,डायमंड पब्लिकेशन्स ,पुणे ,पा. क्र. ४०५
४. मूळ लेखक बी.एल.ग्रोवर मराठी अनुवाद -डॉ. एन.के.बेल्हेकर ,आधुनिक भारताचा इतिहास,एक नवीन मुल्यांकन १७०७ ते १९५० एस.चंद आणि कंपनी लि. नवी दिल्ली ११००५५ पा.क्र. ४०६
५. मूळ लेखक बी.एल.ग्रोवर मराठी अनुवाद -डॉ. एन.के.बेल्हेकर ,आधुनिक भारताचा इतिहास,एक नवीन मुल्यांकन १७०७ ते १९५० एस.चंद आणि कंपनी लि. नवी दिल्ली ११००५५ पा.क्र. ४१०
६. डॉ.टी.एन.शिंदे ,सोलापूरमधील राजकीय विकासाचा इतिहास १८८५ ते १९५० अप्रकाशित प्रबंध पा.क्र.६३
७. मूळ लेखक बी.एल.ग्रोवर मराठी अनुवाद -डॉ. एन.के.बेल्हेकर ,आधुनिक भारताचा इतिहास,एक नवीन मुल्यांकन १७०७ ते १९५० एस.चंद आणि कंपनी लि. नवी दिल्ली ११००५५ पा.क्र.४११